स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, विद्यापीठाच्या मानव्यविद्या शाखे अंतर्गत इतिहास

विषयातील पीएच डी. पदवीकरता सादर करावयाचा

संशोधन आराखडा

"मराठवाड्यातील वारकरी संतांच्या कार्याचा एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. 1200 ते इ.स.1600)"

संशोधकः-

चव्हाण श्रीपती आबाराव

डी. एड, सीटीईटी, एम. ए. सेट, नेट

मार्गदर्शक:-

डॉ. मोरे बब्रुवान केरबाजी

एम ए (इतिहास) सेट,पीएचडी,इतिहास विभाग प्रमुख महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जिल्हा लातूर

संशोधन केंद्र :-

पानसरे महाविद्यालय अर्जापुर, ता. बिलोली, जि. नांदेड

2024

प्रस्तावना :-

मराठवाडा ही संतांची भूमी आहे. मध्ययुगीन मराठवाड्यातील अधोपातीत होत चाललेल्या धार्मिक व सामाजिक जीवनाला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य ज्या पंथांनी केले तो पंथ व संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. या संप्रदायाची सुरुवात संत नामदेव महाराजांनी केली व या संप्रदायाचा प्रसार संत एकनाथ महाराज, संत जनाबाई यांनी मराठवाड्यात केला. संतानी तत्कालीन वैदिक धर्मातील कर्मठता, पांडित्य व यज्ञ यागाचे अवलंब झुगारून अठरा पगड जातीच्या लोकांना आबालवृद्धांना वारकरी पंथाच्या झेंड्याखाली एकत्र आणले. संतांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून समाज शिक्षणाचे, प्रबोधनाचे कार्य त्याकाळी केले, कीर्तन भजन व प्रवचन याद्वारे ते आजही चालूच आहे. वारकरी संप्रदायातील अनेक संतांनी केलेल्या कार्याचे, विचारांचे तत्कालीन सामाजिक परिवर्तनात महत्त्वपूर्ण असे योगदान आहे. संतांनी आपल्या या कार्यासाठी अभंग निर्मिती केली. अभंगांचा महत्त्वाचे साधन म्हणुन वापर केला. आपल्या अभंगाद्वारे लोकांना सामाजिक रीती, नीती बद्दल उपदेश केला. समाजातील अंधश्रद्धा, वाईट प्रथा इत्यादीवर दाखले व दृष्टांत हे अत्यंत सोप्या व मधुर लोक भाषेत मांडून तत्कालीन समाजात वैचारिक जागृती व प्रबोधन घडवून आणण्याचे कार्य संतांनी केले. या वारकरी संप्रदायाचा पाया मराठवाड्यातील संत नामदेव महाराज यांनी रचला असे म्हणावयास हरकत नाही. त्यांनी भक्ती संप्रदायाचा प्रसार नंतर उत्तर भारतात देखील केला. मध्ययुगीन मराठवाड्यात भक्तीमार्गाची जी अनेक पंथ निर्माण झाली त्यातील एक प्रमुख आणि जनसामान्याच्या मनावर आजही अधिराज्य गाजवणार पंथ म्हणजे वारकरी पंथ होय. वारकरी संप्रदाय यालाच भागवत धर्म असे ही म्हटले जाते राज्यात परचक्र आल्याने तसेच ऐतिहासिक घडामोडीमुळे महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक शिथिलता निर्माण झाली होती अशावेळी समाजाला धर्म संस्कृती आणि सदाचार शिकवुन सर्वांना भक्ती आणि व वारीच्या तत्त्वाखाली एकत्र आणण्याचे

काम या पंथांनी केले. वारकरी पंथ हा मुळातच सर्वसामान्य जनाचा पंथ म्हणुन ओळखला जातो येथे वय, जात, लिंग, वर्ण, धर्म भेदभाव याला अजिबात थरा दिला गेला नाही. या साहित स्त्री आणि पुरुष या दोघांनी तितकेच साहित्य निर्माण केले. स्त्री व पुरुष दोघांचे योगदान महत्त्वाचे आहे. वारकरी संप्रदायाच्या प्रसारामुळे स्त्रिया पण काव्यरचना करू लागल्या. वारकरी संप्रदायाची शिकवण ही फक्त भक्ती मार्गा पुरती सिमित नाही तर माणुस म्हणुन जगण्याच्या प्रक्रियेत भक्ती हा एक महत्वाचा भाग आहे. भक्तीच्या शिवाय अनेक गोष्टी असतात ज्या आपल्याला हव्या असतात त्या आपण टाळू शकत नाही. त्यामुळे संतांनी फक्त भक्ती बद्दलच सांगावं आणि बाकीच्या गोष्टीबद्दल बोलायचं नाही असं होऊ शकणार नाही. समाजकारण, राजकारण व संस्कृती या सगळ्या गोष्टी संदर्भात, वारकरी संप्रदायातील संतांनी आपले मत व्यक्त केले.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1. संतांनी समाज प्रबोधनासाढी केलेल्या वाटचालीचा आढावा घेणे.

2. परकीय आक्रमण होत असताना प्रतिकूल परिस्थितीतून संतांनी कसा मार्ग काढला हे स्पष्ट करणे.

3. संतांनी समाजात सामाजिक सलोखा कसा साधला हे स्पष्ट करणे.

4. समाजात होणारा जातिभेद त्यांनी कसा नाकारला हे स्पष्ट करणे.

5. तत्कालीन समाज जाणीवेचा अभ्यास करणे.

6. संस्कृत साहित्य त्यांनी लोक भाषेतुन लोकापर्यंत कसे पोहोचले याचे निरूपण करणे.

7. तत्कालीन सामाजिक दडपण झुगारून स्त्री संतांनी कसा मार्ग काढला हे स्पष्ट करणे.

८. परकीय राजवट असताना देखील संतांनी भक्तिमार्गाचा प्रचार व प्रसार कसा केला हे स्पष्ट करणे.

संशोधनाची आवश्यकता :-

मध्ययुगीन कालखंडात मराठवाड्यातील सामान्य जन अज्ञानाच्या वरवंट्याखाली भरडला जात होता. त्यांना त्यांच्या अज्ञानाची जाणीव कुणी करून दिली असेल तर ती व वारकरी संतांनी करून दिली. समाजात असणाऱ्या विषमतेला वाचा कोणी फोडली असेल तर ती वारकरी संतांनी फोडली. याच कारणामुळे समाजात समाज प्रबोधनास सुरुवात झाली. सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांना वाचा सर्वप्रथम कोणी फोडली असेल तर ती वारकरी संतांनीच फोडली. परकीय राजवटीत सामान्य जन भयग्रस्त असताना त्यांना आधार कुणी दिला असेल तर तो वारकरी संतांनीच दिला. वारकरी संतांनी स्त्री पुरुष भेद तसेच जातीभेद कधीही मानला नाही. सर्वप्रथम अल्लाउद्दीन खिलजी याच्याकाळात महाराष्ट्रात परचक्र आले त्यानंतर महाराष्ट्रातील तसेच मराठवाड्यातील सामान्य जनता मोठ्या प्रमाणात दैववादी बनली. त्यांना या निष्क्रियवृत्तीतून बाहेर काढण्याचे काम कोणी केले असेल तर ते वारकरी संतांनीच केले. दैवादापासून कर्मवादाकडे त्यांना प्रेरित करण्याचे श्रेय वारकरी संतांना दिले पाहिजे. वारकरी संतांनी केलेले सर्वात मोठे काम म्हणजे समाज प्रबोधन होय.मराठवाड्यातील जनता, सामान्य लोक प्रारब्धवादी होऊन आपल्याच नशिबालाच दोष देत बसले असताना त्यांना जगण्याची व लढण्याची प्रेरणा संतांनी दिली संतांच्या प्रेरणेमुळेच महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली त्यामुळे रानडे म्हणतात, स्वराज्याची स्थापना हा महाराष्ट्रात अचानक लागलेला वनवा नव्हता तर संतांनी केलेल्या कार्याचा परिणाम होता.

संशोधनाची गृहितके :-

वरील विषयाची व्याप्ती आणि मर्यादा लक्षात घेऊन पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत. मध्ययुगीन मराठवाड्यातील लोकांना

अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. समाजात विषमता मोठ्या प्रमाणात वाढली होती. कर्मकांडाचे प्रमाण जास्त वाढले होते. संतांचे अभंगातून तत्कालीन परिस्थिती समजण्यास मदत होते. मध्ययुगीन काळात पण स्त्री संतांनी स्वतःची एक वेगळे स्थान निर्माण केलेली दिसून येते. याच काळात सर्वप्रथम जातिभेदाला आव्हान दिले गेले. संताच्या कार्यातून तत्कालीन सामाजिक बंधनांना सामोरे जाणाऱ्या लोकांच्या मानसिकतेचे आपणास दर्शन होते. संतांच्या कार्यामुळे समाज प्रबोधनास सुरुवात झाली हे आपणास कळते. संतांनी सामाजिक प्रश्न कसे हाताळले हे आपणास दिसून येते. संतांनी जातिभेदास विरोध केला हे आपणास दिसून येते. परकियाच्या गुलामित राहणाऱ्या सामान्य जनांची मानसिकता काय असेल हे कळते.

संशोधन पद्धतीः-

वरील विषयाचे ऐतिहासिक आणि विश्लेषणात्मक संशोधन करण्यासाठी. ऐतिहासिक आणि गुणात्मक असे विश्लेषण संशोधन पद्धतीचा अवलंब संशोधका कडून केला जाणार आहे. तसेच प्राथमिक व दुय्यम ऐतिहासिक साधनाचा वापर केला जाणार आहे.

तथ्य संकलनाची पद्धतः-

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर माहिती गोळा करण्यासाठी संशोधक प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत याचा वापर करणार आहे.

तथ्य विश्लेषण आणि निवड प्रक्रिया:-

वरील विषयाच्या संदर्भात जी माहिती गोळा केली जाणार आहे त्या माहितीच्या आधारे वस्तुनिष्ठ विश्लेषण करण्याचा व निष्कर्ष स्थापित करण्याचा संशोधकाचा प्रयत्न आहे.

प्रकरणाची वर्गवारी

प्रकरण 1 विषय प्रवेश

या प्रकरणात विषयाची निवड, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा तसेच संशोधन विषयाचे महत्त्व आणि संशोधनाची पद्धत याची स्पष्टीकरण व संशोधनाची उद्दिष्टे याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 2 मध्ययुगीन मराठवाड्याची ऐतिहासिक ओळख :

या प्रकरणात मराठवाड्याच्या तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल

प्रकरण 3 मराठवाड्यातील वारकरी संत व तत्कालीन परिस्थिती याचा आढावाः

मध्ययुगीन कालखंडात मराठवाड्यात ज्या संतांनी समाज प्रबोधनाचे काम केले त्या सर्व संतांचे कार्य याचा अभ्यास व विवेचन करण्यात येईल

प्रकरण 4 मराठवाड्यातील स्त्री संत साहित्यिका मराठवाड्यातील स्त्री संत

मराठवाड्यातील स्त्री संत साहित्यिका यांच्या कार्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येईल.

प्रकरण 5 संताच्या साहित्या मधुन निर्माण झालेली ऐतिहासिक पार्श्वभूमी.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य निर्माण केले त्या स्वराज्यासाठी अनुकूल पार्श्वभूमी संतांनी निर्माण केली असे म्हणावयास हरकत नाही.

प्रकरण 6 समारोपः

या प्रकरणात सर्व प्रकरणाची मांडणी करून सर्व गृहतिकाची पडताळणी करण्यात येईल व शेवटी हाती आलेल्या निष्कर्षाचा व उपायोजनाचा आढावा घेण्यात येईल. या आराखड्यात आणखी प्रकरण वाढू शकतात.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादाः-

या शोध निबंधाचा विषय "मराठवाड्यातील वारकरी संतांच्या कार्याचा अभ्यास (इ.स. 1200 ते इ.स.1600)" अशा स्वरूपाचा आहे. वारकरी संतांच्या कार्याचा कालखंड संशोधनासाठी इसवीसन बाराशे वे इसवी सन सोळाशे असा घेण्यात आला आहे.

आजवर झालेल्या संशोधनाचा आढावाः-

आतापर्यंत झालेल्या मराठवाड्यातील संतांच्या चरित्र ग्रंथ /ग्रंथाचा संदर्भ या संशोधनासाठी घेण्यात येणार आहे आज पर्यंत अध्यात्मिक तसेच व वांड़मय दृष्टिकोनातून वारकरी संतांच्या कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. पण या संशोधनात वारकरी संतांच्या कार्याचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व मध्ययुगीन कालखंडात देशात तसेच महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले त्यांनी मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती केली. या साहित्यात तत्कालीन समाज जीवन दारिद्रय, समाजातील शोषण, सामाजिक विषमता, स्त्री पुरुष भेदभाव,अस्पृश्यता यांना वाचा फोडण्यात आली त्यात आणखी भर म्हणून की काय देशात तसेच राज्यात तेव्हा परकीय राजवट अस्तित्वात होती. यावेळेस समाजाला कोणी जागी केले असेल तर ते वारकरी संतांनी केले. त्यातही मराठवाड्यातील वारकरी संतांचा यात सिंहाचा वाटा आहे असे म्हणावयास हरकत नाही. दक्षिणेत उगम पावलेल्या भक्ती संप्रदायाचा प्रसार संत नामदेवांनी

उत्तरेत केला. त्यांचे अभंगाचा समावेश समावेश गुरु ग्रंथ साहिब या पवित्र ग्रंथात करण्यात आला आहे. सामाजिक जडणघडणीत संताचा वाटा मोठा आहे. मध्ययुगीन कालखंडात देववादी, निष्क्रिय बनवलेल्या समाजाला झोपेतून जागे करण्याचे काम वारकरी संतांनी केले. सामान्य लोकास देववादी न बनता कर्मवादी बनण्यासउद्‌युक्त वारकरी संतांनीच केले. यासाठी त्यांनी अभंग, भारुड कीर्तन इत्यादी समाज प्रबोधनाच्या माध्यमाचा उपयोग केला पण आतापर्यंत त्यांच्या या कार्याचा अभ्यास वांङ्मयीन व अध्यात्मिक दृष्टिकोनातूनच मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे पण या संशोधनातून त्यांच्या कार्यचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातून करण्यात येईल व वारकरी संतांनी जे समाज प्रबोधन केले त्याचेच फळ म्हणून महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना होऊन या राज्याचे स्वरूप वाढत जाऊन पूर्ण देशभर पसरले. तत्कालीन अभंगातून आपणास समाजातील जी सामाजिक विषमता होती त्याचा परिचय होतो समाजाच्या अनिष्ट चाली रीती प्रचलित होत्या त्यांनां सर्वप्रथम विरोध करण्याचे धारिष्ट जर कोणी दाखवले असेल तर ते यारकरी संतांनी दाखवली.

संदर्भसूची

1. सुहासिनी इर्लेकर, संत कवी आणि कवयित्री एक अनुबंध 2006 स्नेहवर्धन प्रकाशन पुणे,

2. डॉ. सुहासिनी इर्लेकर, जनाबाईचे निवडक अभंग एक चिंतन प्रकाशक रंगनाथ जोशी औरंगाबाद

3. डॉ. शोभा पाटील संत कवयित्रीच्या संत संवेदना.

4. संत नामदेव महाराज चरित्र, ह.भ.प. रंगनाथ महाराज खरात.

5. एकनाथ चरित्र, ल. रा. पांगारकर.

संशोधकः-

चव्हाण श्रीपती आबाराव

डी. सीटीईटी, एम ए (इतिहास) सेट, नेट

मार्गदर्शक

डॉ. मोरे बब्रुवान केरबाजी एड,

एम ए (इतिहास) सेट पीएचडी

इतिहास विभाग प्रमुख

महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर जिल्हा लातूर